# अनुक्रमणिका

**प्रकरण १ : हृदयाची रचना आणि कार्य** १२

१. हृदयाची रचना २. रक्ताभिसरण १२

३. हृदयासंबंधी धातू ४. दोष आणि हृदय १६

**प्रकरण २ : हृदयरोगांचे वर्गीकरण आणि सामान्य लक्षणे** १९

१. आयुर्वेदानुसार रोगांचे वर्गीकरण १९

२. हृदयासंबंधीचे दोष-धातू आणि हृद्रोग २०

३. हृद्रोगाची सामान्य लक्षणे २२

**प्रकरण ३ : वातज हृद्रोग** २३

१. वातज हृद्रोगाची कारणे २३

२. वातज हृद्रोगाची लक्षणे २४

३. वातज हृद्रोग उपचार २४

**प्रकरण ४ : पित्तज हृद्रोग** २७

१. पित्तज हृद्रोगाची कारणे २७

२. पित्तज हृद्रोगाची लक्षणे २७

३. पित्तज हृद्रोग उपचार २७

**प्रकरण ५ : कफज हृद्रोग** २९

१. कफज हृद्रोगाची कारणे २. कफज हृद्रोगाची लक्षणे २९

३. कफज हृद्रोग उपचार २९

**प्रकरण ६ : त्रिदोषज हृद्रोग** ३१

१. त्रिदोषज हृद्रोगाची कारणे ३१

छातीत दुखणे, हृदयरोग आदी... ९

२. त्रिदोषज हृद्रोगाची लक्षणे ३१

३. त्रिदोषज हृद्रोगावरील उपचार ३२

**प्रकरण ७ : कृमिज हृद्रोग** **३४**

१. कृमिज हृद्रोगाची कारणे ३४

२. लक्षणे ३. कृमिज हृद्रोगावरील उपचार ३४

४. हृदयरोगांत उपयोगी पडणाऱ्या औषधी द्रव्यांची सूची ३४

**प्रकरण ८ : जन्मजात हृद्रोग** **३६**

१. प्रस्तावना ३६

२. जन्मजात हृदयविकाराची कारणे ३७

३. त्वचेवर निळेपणा न आणणारे हृदयरोग ३७

४. त्वचेला निळसर झाक असणारा जन्मजात हृदयरोग (सायनॉटिक कॉन्जनायटल हार्ट डिसिज) ४०

५. जन्मजात हृदयरोगांमध्ये आढळणारे उपद्रव ४१

६. जन्मजात हृदयविकार असलेल्या मुलांना कसे हाताळावे ? ४२

**प्रकरण ९ : हृत्शूल – ॲन्जायना** **४४**

१. ॲन्जायना (हृत्शूल) म्हणजे काय ? ४४

२. हृत्शूलाची (ॲन्जायना पेक्टोरिसची) ४५

३. साध्यासाध्यत्व ४५

४. उपचार ४५

**प्रकरण १० : कॉरोनरी थ्राँबोसिस** **५०**

१. हृदयविकाराचा झटका म्हणजे काय ? ५०

२. हृदयरोहिण्यांमध्ये (कॉरोनरी) रक्त का गोठते ? ५०

३. हार्ट ॲटॅकची चिन्हे कोणती ? ५१

४. हार्ट ॲटॅक्स येऊ नये, म्हणून कोणती काळजी घ्यावी ? ५२

५. रक्तातील गुठळी विरघळवण्यासाठी उपचार ५२

६. हृदयविकाराचा झटका आलेला माणूस बरा कसा होतो ? ५३

७. लक्षणे　　८. उपचार ५४

**प्रकरण ११ : हृदयगति विकृति (कार्डिअक अऱ्हिद्‌मिया) ५८**

१. हृदयगति विकृति (कार्डिअक अऱ्हिद्‌मिया) ५८

२. उपचार ५८

**卐 प्रस्तुत ग्रंथाचे असामान्यत्व लक्षात घ्या ! ६१**

---

**टीप : ग्रंथात काही सूत्रांच्या शेवटी मराठी किंवा इंग्रजी संकेतांक केवळ कार्यालयीन सोयीसाठी दिले आहेत.**

## आरोग्य उत्तम राखण्याचे महत्त्व !

आयुर्वेदाला पाचवा वेदच मानले जाते. ‘चरकसंहिता’ हा आयुर्वेदातील एक मूलभूत ग्रंथ आहे. या ग्रंथात आरोग्य उत्तम राखण्याचे महत्त्व पुढीलप्रमाणे सांगितले आहे.

धर्मार्थकाममोक्षाणाम् आरोग्यं मूलमुत्तमम् ।

– चरकसंहिता, सूत्रस्थान, अध्याय १, श्लोक १५

अर्थ : धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे चार पुरुषार्थ साध्य करण्यासाठी ‘उत्तम आरोग्य असणे’ हा पाया आहे.

---

प्रस्तुत ग्रंथात ठिकठिकाणी दिलेले काढे, घृत (औषधसिद्ध तूप), वटी (गोळ्या) इत्यादी औषधी कल्प कसे बनवावेत, यासंबंधीची सविस्तर माहिती सनातन प्रकाशित ‘आयुर्वेदीय औषधी (भाग १) : औषधशास्त्राची मूलतत्त्वे आणि औषधनिर्मिती’ या ग्रंथात दिली आहे.

## मनोगत

आपला श्वास जन्मानंतर चालू होतो; परंतु हृदयाचे आकुंचन-प्रसरण गर्भावस्थेत पहिल्या तीन मासांतच (महिन्यांतच) चालू होते आणि मृत्यूपर्यंत चालू रहाते. जन्मानंतर पहिल्या मासात प्रत्येक मिनिटाला हृदयाचे १४० ठोके पडतात. तरुण माणसांत प्रत्येक मिनिटाला ७२ ठोके पडतात आणि प्रत्येक मिनिटाला ५ लिटर रक्त पंप केले जाते. हृदय हा सर्व शरिराला रक्त पुरवणारा आणि परत सर्व शरिरातून रक्त खेचणारा, तसेच कधीही विश्रांती न घेता सतत चालणारा जिवंत पंप आहे. रक्ताद्वारे तो सर्व पेशी आणि अवयव यांना अन्न, पाणी अन् प्राणवायू (ऑक्सीजन) पुरवतो, तसेच सर्व पेशींतील मळ मूत्रपिंड, फुफ्फुसे आणि त्वचा यांच्याकडे पोहोचवतो. काम करतांना किंवा धावतांना स्नायूंना अन्न, पाणी आणि प्राणवायू यांची अधिक आवश्यकता असते, तेव्हा हृदयाची गती वाढते आणि झोपेत हृदयाची गती घटते. हृदयाचे आकुंचन-प्रसरण एक मिनिट बंद पडले, तरी आपण जिवंत राहू शकत नाही.

योगशास्त्राप्रमाणे हृदय हे अनाहतचक्राचे स्थान आहे. प्राचीन काळापासून कवींनी हृदयाला मनाचे स्थान मानले आहे. एखादा प्रसंग किंवा एखादी व्यक्ती हृदयाला स्पर्श करून किंवा हृदयात घर करून गेली, असे आपण व्यवहारात म्हणतो; कारण मनोभावनांचा हृदय आणि नाडी यांच्या गतीवर सतत परिणाम होत असतो. 'कॉरोनरी आर्टरी'द्वारे हृदयाच्या स्नायूंना रक्त पुरवले जाते. या 'कॉरोनरी आर्टरी'त रक्ताची गुठळी झाल्यास हृदयविकाराचा झटका (हार्ट ॲटॅक) येतो. 'हृदयाचे विकार' या विषयावरील दोन्ही खंडांत मिळून हृदयाचे रोग आणि रक्तदाब यांचे आयुर्वेदीय दृष्टीकोनातून विवेचन केले आहे. या दोन्ही ग्रंथांचा अभ्यास हृदयरोग असलेले, वैद्य आणि आधुनिक वैद्य (डॉक्टर्स) यांना उपयोगी पडेलच, तसेच सर्वांना 'आपले हृदय आरोग्यसंपन्न आणि कार्यक्षम कसे ठेवावे', याचेही मार्गदर्शन मिळेल. हृदयविकार झालेले रोगी विकारापासून मुक्त होवोत आणि सर्व जण निरामय जीवनाचा आनंद लुटोत, हीच त्या जगन्नियंत्या परमेश्वराजवळ मनापासून प्रार्थना ! – **लेखक**